।। श्री गणेशाय नमः ।।

।। श्री रंगमुर्तये नमः ।। ।। श्री जगदंबा गुरुभ्यो नमः ।।

# श्री सद्गुरु राजयोगी निजानंद रंगनाथस्वामी महाराज

निगडी, ता. कोरेगाव, जि. सातारा



जन्म : मार्गशीर्ष शुध्द १०, शके १५३४
मु. पो. नाझरे, ता. सांगोला, जि. सोलापूर

समाधी : मार्गशीर्ष वद्य १०, शके १६०६
मु. पो. निगडी, ता. कोरेगाव, जि. सातारा

# पंचपदी - गुरुगीता
# आरती

॥ श्री ॥

असो व्यासाज्ञा धरी राजयोगा । निजानंद रुपी परी नित्य जागा ॥
जना दाखवी भक्तीमार्गाते नामे । नमस्कार त्या श्रीरंगनाथ स्वामी॥



॥ श्री गणेशाय नमः ॥

॥ श्री रंगमुर्तये नमः ॥ ॥ श्री जगदंबा गुरुभ्यो नमः ॥

## • ध्यान •

अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त
निजानंद रंगनाथ स्वामी महाराज की जय
ॐ इषंदत्तं सदानंद रामानंद तथा मलं ।
गंभीर सततं ब्रह्म सहजानंद रुपकम ।
पुर्णानंद गुरुदेवो निजानंद जगत्पति ते ।
श्रीरंग मूर्ति प्रसादेन विठ्ठलं तंनमाम्यहम ॥ १ ॥

केशवं सद्‌गुरु वंदे योगशास्त्र विशारदं ।
श्रोत्रियं ब्रह्मनिष्ठं तं श्रीकृष्ण गुरुवे नमः ॥ १ ॥
गुरुर्ब्रह्मा, गुरुर्विष्णु, गुरुर्देवो महेश्वराः
गुरुसाक्षात परब्रह्म तस्मै श्री गुरुवेनमः ॥ २ ॥
ध्यानमुंल गुरुमुलं पुजामुंलं गुरुपदं ।
मंत्रमूलं गुरुर्वाक्य मोक्षमुलं गुरुकृपा ॥ ३ ॥

ब्रह्मानंदं परमसुखंदमं केवलं ज्ञानमुर्ती ।
द्वंद्वातीतं गगन सदृशं तत्व मस्यदिलक्षणम ।
एकनित्यं विमल मचलं सर्वाधि साक्षिभूतं ।
भावातितं त्रिगुण रहितं सद्‌गुरुं तंनमामी ॥ ४ ॥

## • समर्थ पंचायतन स्तोत्र •

कल्याण क्षेत्री अधिष्ठान ज्याचे । सदानंद आनंद वर्णीत वाचे ।।
तया सांप्रदायी असे हा आनंदु । ब्रह्मादी विष्णु तया आधी वंदु ।। ध्रु ।।
निःस्सिम भक्ती रघुनाथ पायी । वैराग्य योगा विचरे सदाही ।।
त्या रामदासे ध्वज लावियेला । श्रीराम नामे जग निवविला ।। १ ।।
निःस्सिम शांती परिपूर्ण अंगी । जो ब्रह्मचारी गुरु भक्त योगी ।।
सत् चित्सुखे जो पहूडे आरामी । स्मरा स्मरा तो जयराम स्वामी ।। २ ।।
आकाशीची गज ढाल जैशी । अगाध विश्वी निजकीर्ती तैशी ।।
निजात्म बोधे विचरे स्वलिले । श्रीरंगनाथा स्मरा वेळोवेळे ।। ३ ।।
परम कठिण शीला डोलवीं वृक्ष जैसा ।
जननी जठरी कुशी जन्मला कोण ऐसा ।।
गुरु भजन प्रतापे ख्याती केली दिगंती ।।
अनुदिनी स्मर चित्ता स्वामी आनंद मूर्ती ।। ४ ।।
प्रेमामृते हे मन पूर्ण झाले । बोले जयाच्या जग हे निवाले ।
यथार्थ ज्ञाने विचरे स्वलिले । श्री केशवाते स्मरा एक्वेळे ।। ५ ।।



## • श्री रंगनाथस्वामींचे ध्यान व श्लोक •

ज्याच्या सम्यक दर्शने सकल ही पातके नासती ।।
संवादे निजमुक्ती देउनि दयालुत्वे बहुतोषती ।।
आले ते जरी आश्रमा तरीं ।। रमा आणोनि देतो करी ।।
पूर्णत्वे निजरंग निर्गुण पुरी दिनासी जो उद्धरी ।। १ ।।
माथा मंदिल भर्जरी निढळी तो शोभे टिळा केशरी ।।
मोत्यांचा विलसेचि चवकडा कानात बाळी बरी ।।
शेला तो जरीचा कृपाण करिसे ती ढाल पाठी महा ।।
कांती उत्तम रंगनाथ नयनीं ते राजयोगी पहा ।। २ ।।
पौची ती मणिबंधि कंचुक वसे तो कीनखापी बरा ।।
तोडा कांचन पायी चर्म गुडघी राहे दिसे साजिरा ।।
घोडा शुभ्र मनासि शीघ्र हरि जो जोडा जरीचा अहा ।।
कांती उत्तम रंगनाथ नयनी ते राजयोगी पहा ।। ३ ।।
ज्याचा आश्रम ब्रह्मचार्यच सदा आनंद सन्मार्ग तो ।।
राहे निर्गुण धाम नामक पुरी श्रीव्यास आज्ञेचिं तो ।।
ज्याचा बोध जनास इष्ट बरवा लागे मना मिष्ट हा ।।
कांती उत्तम रंगनाथ नयनी ते राजयोगी पहा ।। ४ ।।
हाती वेत विवेक पूर्ण भरिते वैराग्य साधी कळा ।।
काषांयावर धरि कौपिन कटी रुद्राक्ष माळा गळा ।।
अंगी भक्ती विभूती शोभती बरी प्रत्यक्ष तो हा शशी ।।
रंगी रंगुनिया जनार्दन सुखे आनंदला मानसी ।। ५ ।।

# • श्री रंगनाथ स्वामी यांचे अष्टक •

महाराष्ट्र नामे पहा माणदेश । असे माणगंगा पवित्र तिरास ।
जयाची असे नाझरे जन्मभूमी । नमस्कार त्या श्रीरंगनाथ स्वामी ।। १ ।।
बयाबाई माता पिता बोपाजी तो । तयाचे कुशी की असे जन्मला तो ।।
जयाचे असे घोडके कुळ नामी । नमस्कार त्या श्रीरंगनाथ स्वामी ।। २ ।।
बयाबाई स्वप्नीं गुरुमूर्ती आली । गुरु ओटींमाजी फळे तीन घाली ।।
दिला एक परतोनी नमिल ते स्वामी। नमस्कार त्या श्रीरंगनाथ स्वामी ।। ३।।
गुरुचे प्रसादे बया माउलीसी । असे जाहले तीन पुत्र सतीशी ।।
गुरुचे प्रसादे ती वर्ते स्वधर्मी । नमस्कार त्या श्रीरंगनाथ स्वामी ।। ४ ।।
सदा रंगनाथ असे तो उदासीं । वैराग्ययुक्त असे तो मनासी ।।
नसे आच कोठेची रुपी आरामी । नमस्कार त्या श्रीरंगनाथ स्वामी ।। ५ ।।
सोडोनी आशा गृह तें धनाची । सदा आस ज्यासी गुरुचे कृपेची ।।
म्हणोनी पहा सोडली जन्मभूमि । नमस्कार त्या श्रीरंगनाथ स्वामी ।। ६ ।।
केली पहा सर्व तीर्थे जयाने । गिरी कंदरी वास केला तयाने ।।
वसे बद्रीकेदारी तपी आरामी । नमस्कार त्या श्रीरंगनाथ स्वामी ।। ७ ।।
प्रचिती पहाया तपाचीच जेव्हां । धरी व्याघ्र रुपासी अवधूत तेंव्हा ।।
गुरुरुप व्याघ्र बघे अंतर्यामी । नमस्कार त्या श्रीरंगनाथ स्वामी ।। ८ ।।
प्रसन्न झालेच ते सुत अत्री । महापातकी लोक झाले धरित्री ।।
रक्षोनी ब्राह्मण्य लावी स्वधर्मी । नमस्कार त्या श्रीरंगनाथ स्वामी ।। ९ ।।
असे व्यासाज्ञा धरी राजयोगा । निजानंद रुपी परी नित्य जागा ।।
जना दाखवी भक्तिमार्गति नामी । नमस्कार त्या श्रीरंगनाथ स्वामी ।। १० ।।
धरी राजयोगा विचरे मही तो । असे नाझरे जन्मभूमी आले ते ।।
करी वंदना मातृ-पित्यासी स्वामी । नमस्कार त्या श्रीरंगनाथ स्वामी ।। ११ ।।
जगा ज्ञान द्याया निघाले ज्ञणी ते । मिळाले जगी स्वामी पंचायना ते ।।
रक्षोनी ब्राह्मण्य लावीं स्वधर्मी । नमस्कार त्या श्रीरंगनाथ स्वामी ।। १२ ।।
लचके पहा अश्वाची पाय जेथे । करीं नित्य स्वामी वस्तीच तेथे ।।
निगडी असे नाम पवित्र ग्रामी । नमस्कार त्या श्रीरंगनाथ स्वामी ।। १३ ।।
शरीरा असे जाण वार्धक्य आले । निजानंद रुपी पहा ते निमाले ।।
समाधी सुखे तोचि राहे आरामी । नमस्कार त्या श्रीरंगनाथ स्वामी ।। १४ ।।



समाधी पहाता मन शांत होते । करी भक्ति त्यासीच आनंद देते ।।
मनी आठविता रमे तो आरामी । नमस्कार त्या श्रीरंगनाथ स्वामी ।। १५ ।।
सदा नित्य जो कां स्मरे अष्टकाते । महा पातके जाय त्यांची लयाते ।।
मिळे पूर्वजा स्वर्ग ते पुण्यभूमि । नमस्कार त्या श्रीरंगनाथ स्वामी ।। १६ ।।
गुरुचे कृपे शोडष अष्टका ते । असे वाहिले हेच स्वामी पदा ते ।।
दे काशीनाथा लयराम नामी । नमस्कार त्या श्रीरंगनाथ स्वामी ।। १७ ।।
।। निजानंद रंगनाथ स्वामी महाराज की जय ।।

## • पंचपदी •

येई येई हो श्रीरंगे, माझे अंतररंगे करुणा कल्लोळे ।
निज सखये निष्ठूर झालीस माय येई येई हो ।। ध्रु ।।
रविशशी विण जैसी, दिन रजनी शोभा नपवे माय ।
वाचुन दिनबिंदू । क्षिरसिंधू । टाकून चातक जाय ।
मीना जल नाही । तरि काहि दधि मधू सेविल काय तैसे
तुजवीण हो । निजसखये । उपाय ते अपाय ।। १ ।।
कंठि कृष्ण मणि न विराजे । कुंकुम न वसे भाळी ।
त्या विण वधू सर्व । शृंगार । लेवुनि काय जाळी ।
मंगलदायक ती अति हरुषे मिरवी तैसे भाळी ।
तैसे तुजविण हो या विधिने लिहिले से कपाळी ।। २ ।।
करुणा परिसोनि । चिद्गगनी । बोले मंजुळ शब्द ।
सखया सावधरे सावधरे । का करिशी हा खेद
सत्ता एक जगी । विलसतसे । तुज मज कैसा भेद
वियोग भंगला । रंगला । अवघा निजानंद ।
विचरे सहज सहज सुखे । चिद्भुवनि । जीवन जैसे जिवनी
विचरे सहज सुखे । येई येई हो ।। ३ ।।

भजन : श्री रंगनाथ जय रंगनाथ जय जय निजानंद रंगनाथ ।।

## ।। श्री रंगनाथ स्वामीकृत श्रीगुरुगीता ।।

श्री गणेशाय नमः । श्रीसरस्वत्यै नमः । श्री गुरुभ्यो नमः ।
श्री सद्गुरु निजानंदाय नमः ।। श्री सद्गुरु रंगनाथाय नमः ।

ॐ नमो सद्गुरु परब्रह्म । तूं निर्विकल्प कल्पद्रुम । हरहृदयविश्रामधाम । निजमूर्ति राम तूं स्वयें ।। १ ।। तुझा अनुग्रह जया घडे । तया नाही काही सांकडे । दर्शन मोक्षद्वार उघडे । तुझेनि पडिपाडें तूंचि तूं ।। २ ।। कोण एके दिवशी । श्रीसदाशिव कैलासी । ध्यानस्थ असे तो मानसी । पुसे तयासी पार्वती ।। ३ ।। जयजयाजी परात्परा । जगद्गुरु कर्पूरगौरा । गुरुदिक्षा निर्विकारा । श्रीशंकरा मज देई ।। ४ ।। कवणे मार्गे जी स्वामी । जीव परब्रह्म होती ते मी । पुसतेस तरी सांगिजे तुम्ही । अंतर्यामी कळे ऐसे ।। ५ ।। कृपा करावी अनाथनाथा । म्हणोनि चरणी ठेविला माथा । नसोनिया भवव्यथा । कैवल्यपंथा मज दावी ।। ६ ।। ईश्वर म्हणे वो देवी । तुझी आवडी मातें वदवी । लोकोपकारक प्रश्न पूर्वीं । देवी दानवी जो न केला ।। ७ ।। तरी दुर्लभ या त्रिभुवनात । तें तूं ऐके वो सुनिश्चित । सद्गुरु ब्रह्म सदोदित । सत्य सत्य वरानने ।। ८ ।। वेद शास्त्र पुराणा । मंत्रतंत्रादि विद्या नाना । करिता तीर्थव्रततप-साधना । भवबंधनमोचना न पावती ।। ९ ।। शैव शाक्त आगमदिके । अनेक मते अपभ्रंशके । समस्त जीवा भ्रांतिदायके । मोक्षप्रापके नव्हतीच ।। १० ।। जया चाड पराभक्ती । तेणे सद्गुरु सेवावा एकांती । गुरुतत्व जे जाणती । मूढमती जन कोणी ।। ११ ।। होवोनी निःसंशय । सेवावे सद्गुरुपाय । भवसिंधु तरणोपाय । तत्काळ होय जडजीवा ।। १२ ।। गूढ अविद्या जगन्माया । अज्ञान संहारित जीवा या । मोहांधकारा गुरुवर्या । सन्मुख यावया मुख कैसे ।। १३ ।। जीव ब्रह्मत्त्व त्याचिये कृपा । होती निरसुनी सर्व पापा । सद्गुरु स्वयंप्रकाशदीपा । शरण निर्विकल्पा रिघावे ।।१४।। सर्व तीर्थांचे माहेर । सद्गुरुचरणतीर्थ निरंतर । सद्भावे सच्छिष्य नर । सेविता परपार पावले ।। १५ ।। शोषेण पापपंकाचे । ज्ञानतेज करी



साचे । वंदिता चरणतीर्थ सद्गुरुचे । भवाब्धीचे भय काय ।। १६ ।। अज्ञानमूलहरण । जन्मकर्मनिवारण । ज्ञानसिद्धिचे कारण । गुरुचरणतीर्थ ते ।। १७ ।। गुरुचरणतीर्थ प्राशन । गुरु आज्ञा उच्छिष्ट भोजन । गुरुमूर्तीचे अंतरी ध्यान । गुरुमंत्र वदनी जपे सदा ।। १८ ।। गुरुसान्निध्य तो काशीवास । जान्हवी चरणोदक निःशेष । गुरुविश्वेश्वर निर्विशेष । तारकमंत्र उपदेशिता ।। १९ ।। गुरुचरणतीर्थ पडे शिरी । प्रयागस्नान ते निरधारी । गयागदाधर सबाह्यांतरी । सर्वांतरी साधका ।। २० ।। गुरुमूर्ति नित्य स्मरे । गुरुनाम जपे आदरे । गुरुआज्ञा पालन करे । नेणिजे दुसरे गुरुविना ।। २१ ।। गुरुस्मरण मुखी राहे । गुरुनाम तोचि ब्रह्मरुप पाहे । गुरुमूर्ती ध्यानी वाहे । जैशी कां हे स्वैरिणी ।। २२ ।। वर्णाश्रमधर्म सत्कीर्ति । वाढवावी सद्वृत्ती । अन्यत्र त्यजोनिया गुंती । सद्गुरुभक्ती करावी ।। २३ ।। अन्यन्यभावे गुरुसी भजता । सुलभ परमपद तत्त्वता । तस्मात् सर्वप्रयत्ने आता । सद्गुरुनाथा आराधी ।। २४ ।। गुरुमुखीचे महावाक्यबीज । गुरुभक्तीस्तव लाभे सहज । त्रैलोक्यी नाचे भोज । तो पूज्य होय सुरनरां ।। २५ ।। गुकार तो आज्ञानांधकार । रुकार वर्ण तो दिनकर । स्वयंप्रकाशतेजा समोर । न राहे तिमिर क्षणभरी ।। २६ ।। प्रथम गुकार शब्द । गुणमयी मायास्पद । रुकार तो ब्रह्मानंद । करी विच्छेद मायेचा ।। २७ ।। ऐसे गुरुपद श्रेष्ठ । देवां दुर्लभ उत्कृष्ट । गणगंधर्वादि वरिष्ठ । महिमा स्पष्ट नेणती ।। २८ ।। शाश्वत सर्वीं सर्वदाही । गुरुपरत्वे तत्त्व नाही । कायावाचामने पाही । जीवित तेहि समर्पावे ।। २९ ।। देहादि भुवनत्रय समस्त । इतर पदार्थ नाशिवंत । वंचोनिया विमुख होत । अधःपात घडे तया ।। ३० ।। म्हणोनि आराधावा श्रीगुरु । करोनि दीर्घदंड नमस्कारु । निर्लज्य होऊनिया परपारु । भवसागरु तरावा ।। ३१ ।। 'आत्मदारादिकं चैव' । निवेदन करुनी सर्व । हा नाही जया अनुभव । तयास वाटे अभिनव वरानने ।। ३२ ।। जे संसारवृक्षारुढ झाले । पतन नरकार्णवी पावले । ते गुरुराये उद्धरिले । सुखी केले निजभजनी ।। ३३ ।। ब्रह्मा विष्णू सदाशिव । गुरुरुप ते स्वयमेव । गुरु

परब्रह्म सर्वथैव । गुरुगौरव न वर्णवे ।।३४ ।। अज्ञानतिमिरे अंध । ज्ञानांजन-शलाका प्रसिद्ध । दिव्य चक्षु शुद्धबुद्ध । महानिधी दाखविला ।। ३५ ।। अखंड मंडलाकार । जेणे व्यापिले चराचर । तये पदी केले स्थिर । नमस्कार तया गुरुवर्या ।। ३६ ।। श्रुतीसार शिरोरत्न । चरणांबुज परम पावन । वेदांत कमलिनीचिद्भानु । तया नमन गुरुवर्या ।। ३७ ।। ज्याचे स्मरणमात्रे ज्ञान । साधकां होय उत्पन्न । ते निजसंपत्ति जाण । दिधली संपूर्ण गुरुराये ।। ३८ ।। चैतन्य शाश्वत शांत । नित्य निरंजन अच्युत । नादबिंदु कालातीत । नमन प्रणिपात गुरुवर्या ।। ३९ ।। ज्ञानशक्तीसंमारुढ । तत्त्वमाला भूषित दृढ । भुक्तिमुक्तिदाता प्रौढ । सद्गुरु गूढ सुखदानी ।। ४० ।। अनेक जन्मीचे सुकृत । निरहंकृति निर्हेत । तरीच प्रबोध प्राप्त । जरी श्रीगुरुहस्त मस्तकी ।। ४१ ।। जगन्नाथ जगद्गुरु एक । तो माझा स्वामी देशिक । ममात्मा सर्वभूतव्यापक । वैकुंठनायक श्रीगुरु ।। ४२ ।। ध्यानमूल गुरुराय । पूजामूल गुरुपाय । मंत्रमूल नि:संशय । मोक्षमूल गुरुकृपा ।। ४३ ।। सप्तसिंधु अनेक तीर्थीं । स्नानेंपाने जे फलप्राप्ती । एक बिंदुसम न पावती । सद्गुरुचरणतीर्थाच्या ।। ४४ ।। ज्ञानेविण सायुज्यपद । अलभ्य लाभें अगाध । सद्गुरुभक्तीने प्रबोध । स्वत: सिद्ध पाविजे ।। ४५ ।। सद्गुरुहूनि परात्पर । नाही नाही वो साचार । 'नेति' शब्दे निरंतर । श्रुतिशास्त्रे गर्जति ।। ४६ ।। मदाहंकारगर्वेकरुनी । विद्यातपबळान्वित होवोनि । संसारकुहरावर्ती पडोनी । नाना योनी भ्रमताति ।। ४७ ।। न मुक्त देवगणगंधर्व । न मुक्त यक्षचरणादि सर्व । सद्गुरुकृपेने अपूर्व । सायुज्यवैभव पाविजे ।। ४८ ।। ऐके वो देवी ध्यानसुख । सर्वानंदप्रदायक । मोहमायार्णवतारक । चित्सुखकारक श्रीगुरु ।। ४९ ।। ब्रह्मानंद परमाद्भूत । ज्ञानबिंदुकलातीत । निरतीशयसुख संतत । साक्षभूत सद्गुरु ।। ५० ।। नित्य शुद्ध निराभास । नित्यबोध चिदाकाश । नित्यानंद स्वयंप्रकाश । सद्गुरु ईश सर्वांचा ।। ५१ ।। हृदयकमळीं सिंहासनी ।। सद्गुरुमूर्ती चिंतावी ध्यानी । श्वेतांबर दिव्यभूषणी । चिद्रत्नकिरणी सुशोभित ।। ५२ ।।



आनंदनंदकर प्रसन्न । ज्ञानस्वरुप निजबोधपूर्ण । भवरोगभेषज जाण । सद्वैद्य चिद्घन सद्गुरु ।। ५३ ।। सद्गुरुपरते अधिक काही । आहे ऐसा पदार्थ नाही । अवलोकिता दिशा दाही । न दिसे तिही त्रिभुवनी ।। ५४ ।। प्रज्ञाबळे प्रत्योत्तर । गुरुसि विवादती जे नर । ते भोगती नरक घोर । यावच्चंद्र दिनमणी ।। ५५ ।। अरण्य निर्जन स्थानी । भ्रमती ब्रह्मराक्षस होऊनि । गुरुसी बोलती उद्धट वाणी । एकवचनी सर्वदा जे ।। ५६ ।। क्षोभता देव ऋषि काळ । सद्गुरु रक्षी न लागतां पळ । दीननाथ दीनदयाळ । भक्तवत्सल सद्गुरु ।। ५७ ।। सद्गुरुचा क्षोभ होता । देव ऋषिमुनि तत्त्वता । रक्षिती हे दुर्वार्ता । मुर्खही सर्वथा नायकती ।। ५८ ।। मंत्रराज हे देवी । 'गुरु'ही दोन अक्षरे बरवी । वेदार्थवचने जाणावी । ब्रह्मपदवी प्रत्यक्ष ।। ५९ ।। श्रुतिस्मृति न जाणती । (परी) गुरुभक्तीची परम प्रीति । ते संन्यासी निश्चिती । इतर दुर्मति वेषधारी ।। ६० ।। नित्य ब्रह्म निराकार । निर्गुणबोध परात्पर । तो सद्गुरु पूर्णावतार । दीपासि दीपांतर नाही जैसे ।। ६१ ।। गुरुकृपा प्रसादे । निजात्मदर्शन स्वानंदे । पावोनिया पूर्ण पदे । पेलती दोर्दें मुक्तीसी ।। ६२ ।। आब्रह्मस्तंबपर्यंत । स्थावरजंगमादि पंचभूते । सच्चिदानंदाद्वय अव्यक्त । अच्युदानंद सद्गुरु ।। ६३ ।। परात्पर ध्यान । नित्यानंद सनातन । हृदयीं सिंहासनी बैसवून । चित्ती चिंतन करावे ।। ६४ ।। अगोचर अगम्य सर्वगत । नामविवर्जित । नि:शब्द जाण निभ्रांत । ब्रह्म सदोदित पार्वती ।। ६५ ।। अंगुष्ठमात्र पुरुष । हृदयी ध्याता स्वप्रकाश । तेथे स्फुरती भाव विशेष । निर्विशेष पार्वती ।। ६६ ।। ऐसे ध्यान करिता नित्य । तादृश होय सत्य सत्य । कीटकी भृकुटीचें निमित्त । तद्रूप झाली ते जैशी ।। ६७ ।। अवलोकिता तयाप्रति । सर्वसंग विनिर्मुक्ति । एकाकी नि:स्पृहता शांति । आत्मस्थिती रहावे ।। ६८ ।। सर्वज्ञपद त्या बोलती । जेणे देही ब्रह्म होती । सदानंदे स्वरुपप्राप्ति । योगी रमती पै जेथे ।। ६९ ।। उपदेश होता पार्वती । गुरुमार्गी होय मुक्ती । म्हणूनि करावी गुरुभक्ती । हे तुजप्रति बोलतसे ।। ७० ।। जे मी बोलिलो तुज । ते गुजाचे निजगुज । लोकोपकारक

सहज । हे तूं बुझ वरानने ।। ७१ ।। लौकिक कर्म ते हीन । तेथें कैचे आत्मज्ञान । गुरुभक्तासी समाधान । पुण्यवान ऐकता ।। ७२ ।। एवं या भक्तिभावे । श्रवणे पठणे मुक्त व्हावे । ऐसे बोलता सदाशिवे । डोलती अनुभवे गुरुभक्त ।। ७३ ।। गुरुगीता हे देवी । शुद्ध तत्व पूर्ण पदवी । भवव्याधिविनाशिनी स्वभावी । स्वयमेव देवी जपे सदा ।। ७४ ।। गुरुगीतेचे अक्षर एक । मंत्रराज हा सम्यक । अन्यत्र मंत्र दुःखदायक । मुख्य नायक हा मंत्र ।। ७५ ।। अनंत फळे पावविती । गुरुगीता हे पार्वती । सर्वपापविनिर्मुक्ति । दुःखदारिद्रय नाशिनी ।। ७६ ।। कालमृत्यु भयहर्ती । सर्वसंकट नाशकर्ती । यक्ष-राक्षस प्रेत-भूती । निर्भय वृत्ती सर्वदा ।। ७७ ।। महाव्याधी विनाशिनी । विभूती सिद्धिदायिनी । अथवा वशीकरण मोहिनी । पुण्यपावनी गुरुगीता ।। ७८ ।। कुश अथवा दुर्वासन । शुभ्र कंबल समसमान । एकाग्र करुनिया मन । सद्‌गुरुध्यान करावे ।। ७९ ।। शुक्ल शांत्यर्थ जाण । रक्तासने वशीकरण । अभिचारी कृष्णवर्ण । पीतवर्ण धनागमी ।। ८० ।। शांत्यर्थ उत्तराभिमुख । वशीकरण पूर्व देख । दक्षिण मारण उल्लेख । धनागमा मुख पश्चिमे ।। ८१ ।। मोहन सर्व भूतांसी । बंधमोक्षक विशेषी ।। राजा वश्य निश्चयेसी । प्रिय देवासी सर्वदा ।। ८२ ।। स्तंभनकारक जप । गुणविवर्धन निर्विकल्प । दुष्कर्मनाशक अमूप । सुखस्वरुप सनातन ।। ८३ ।। सर्वशांतिकर विशद । वंध्या पुत्रफलप्रद । सौभाग्यप्रद । अगाध बोध जपता हे ।। ८४ ।। आयुष्य आरोग्य ऐश्वर्य । पुत्रपौत्र धैर्योदार्य । विधवा जपता परमाश्चर्य । मोक्षैश्वर्य पावती ।। ८५ ।। अवैधव्याची कामना । धरिता पूर्ण होय वासना । सर्व दुःख भयविघ्ना । पासोनि सुजना सोडवी ।। ८६ ।। सर्वबाधाप्रशमनी प्रत्यक्ष । धर्मार्थकाममोक्ष । जे जे चिंतिलें तो पक्ष । गुरुदास दक्ष पावती ।। ८७ ।। कामिकां कामधेनु गाय । कल्पिती तया कल्पतरु होय । चिंतीती तया चिंतामणिमय । मंगलमय सर्वांसी ।। ८८ ।। गाणपत्य शक्ति सौर । शैव वैष्णव गुरुकिंकर । सिद्धि पावती सत्वर । सत्य सत्य वरानने ।। ८९ ।। संसारमलनाशार्थ । भवबंधपाश



निवृत्त । गुरुगीतास्नाने सुस्नात । शुचिभूर्त सर्वदा ।। ९० ।। आसन शयनी गमनागमनी । अश्व गज अथवा यानी । जागृती सुषुप्ती स्वप्नी । पढता होय ज्ञान गुरुगीता ।। ९१ ।। गुरुगीता पढता भक्त । सर्वदा तो जीवनमुक्त । त्याच्या दर्शने पुनीत । पुनर्जन्म न होत प्राणियां ।। ९२ ।। अनेक उदके समुद्र उदरी । नानावर्णां धेनू क्षीर क्षीरी । अभिन्नरुपे निर्धारी । सर्वांतरी एकची ।। ९३ ।। घटाकाश मठाकाश । उपाधिभेदे भिन्न वेष । महदाकाश निर्विशेष । द्वैताचा लेश नाढळे ।। ९४ ।। भिन्न भिन्न प्रकृति । कर्मवेषे दिसती आकृति । घेऊनि जीवपदाची बुंथी । विविध भासती नानारुपे ।। ९५ ।। नाना अलंकारी सुवर्ण । तैसा जीवात्मा पूर्ण । तेथे नाही वर्णावर्ण । कार्यकारणतीते ।। ९६ ।। या स्वानुभवे गुरुभक्त । वर्तती ते जीवन्मुक्त । गुरुभक्त ते वेदोक्त । जे का विरक्त सर्वस्वे ।। ९७ ।। अनन्यभावे गुरुगीता । जपता सर्व सिद्धी तत्त्वता । मुक्तिदायक जगन्माता । संशय सर्वथा न धरी तूं ।। ९८ ।। सत्य सत्य हे वर्म । मी बोलिलो सर्व धर्म । नाही गुरुगीतेसम । तत्त्व परम सद्‌गुरु ।। ९९ ।। एक देव एक जप । एकनिष्ठा परंतप । सद्‌गुरु परब्रह्मस्वरुप । निर्विकल्प कल्पतरु ।। १०० ।। माता धन्य पिता धन्य । याति कुल वंश धन्य । धन्य वसुधा देवी धन्य । धन्य धन्य गुरुभक्ती ।। १०१ ।। गुरुपुत्र अपंडित । जरी मूर्ख तो सुनिश्चित । त्याचेनी सर्व कार्यसिद्धी होत । सिद्धांत हा वेदवचनी ।। १०२ ।। शरीर इंद्रिये प्राण । दारा-पुत्र-कांचन-धन । श्रीगुरु चरणावरुन । ओवाळून सांडावे ।। १०३ ।। आकल्प जन्म कोडी । एकाग्र मने जपता प्रौढी । तपाची हे फळजोडी । गुरुसी अर्धघडी विमुख नोहे ।। १०४ ।। ब्रह्मादिक देव समर्थ । त्रिभुवनी वंद्य यथार्थ । गुरुचरणोदकावेगळे व्यर्थ । अन्य तीर्थ निरर्थक ।। १०५ ।। सर्व तीर्थात तीर्थ श्रेष्ठ । श्रीगुरुचरणांगुष्ठ । निवारी संसारकष्ट । पुरवी अभिष्ट इच्छिले ।। १०६ ।। हे रहस्यवाक्य तुजपुढे । म्यां कथिले निजनिवाडे । माझेनि निजतत्त्व गौप्य उघडे । करुनि वाडेकोडे दाखविले ।। १०७ ।। मुख्य गणेशादि वैष्णव । यक्ष-किन्नर-गणगंधर्व । तयासही सर्वथैव । हे अपूर्व न वदे मी ।। १०८ ।। अभक्त

वंचक धूर्त । पाखंडी नास्तिक दुर्वृत्त । तयासी बोलणे अनुचित । हा गुह्यार्थ पै माझा ।। १०९ ।। सर्व शास्त्रांचे मथित । सर्ववेदांतसंमत । सर्व स्तोत्रांचा सिद्धांत । मूर्तिमंत गुरुगीता ।। ११० ।। सकल भुवने सृष्टि । पाहता व्यष्टि समष्टी । मोक्षमार्ग हा दृष्टि । चरणांगुष्ठी सद्गुरुच्या ।। १११ ।। उत्तरखंडी स्कंदपुराणी । ईश्वरपार्वती संवादवाणी । गुरुगीता ऐकता श्रवणी । विश्वतारिणी चिद्गंगा ।। ११२ ।। हे गुरुगीता नित्य पढे । तया सांकडे कवण पडे । तत्काळ मोक्षद्वार उघडे । ऐक्य घडे शिवस्वरुपी ।। ११३ ।। हे न म्हणावी प्राकृत वाणी । केवळ स्वात्मसुखाची खाणी । सर्व पुरवी शिराणी । जैसा वासरमणि तम नाशी ।। ११४ ।। श्रोतयां वक्तयां विद्वज्जना । अनन्य भावे विज्ञापना । न्यूनपूर्ण नाणिता मना । क्षमा दीनावरि कीजे ।। ११५ ।। हे गुरुगीतेची टिका । न म्हणावी जे पुण्यश्लोका । पदपदार्थ पहाता निका । दृष्टी साधकां दिसेना ।। ११६ ।। आवडीची जाती वेडी । वाचे आले ते बडबडी । मूळ ग्रंथ कडोविकडी । न पाहता तातडी म्यां केली ।। ११७ ।। नाही व्याकरणी अभिनिवेश । नाही संस्कृती प्रवेश । धीटपणे लिहिता दोष । गमला विशेष मनाते ।। ११८ ।। परी सलगी केली पायासवे । ते पंडितजनी उपहासावे । उपेक्षा न करुनी सर्वभावे । अवधान द्यावे दयालुत्वे ।। ११९ ।। विकृतिनाम संवत्सरी । भाद्रपदमासी भृगुवासरी । वद्य चतुर्थी नीरातिरीं । ग्रंथ केला समाप्त ।। १२० ।। आनंदसांप्रदाय । वंशोद्भव माध्यंदिनशाखा-अभिनव । गुरुगीतेचा अनुभव । हृदयीं स्वयमेव प्रगटला ।। १२१ ।। सहज पूर्ण निजानंदे । रंगला तो साधुवृंदे । श्रवण करावा स्वच्छंदे । ग्रंथ निर्द्वंद्व गुरुगीता ।। १२२ ।।

इति श्रीगुरुगीता संपूर्ण ।

श्रीसद्गुरु निजानंदार्पणमस्तु । श्री सद्गुरु रंगनाथार्पणमस्तु।।

शुभं भवतु ।

श्रीरस्तु । ॐ तत्सत् । श्रीगुरुदेव दत्त ।।

।। दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ।।





आरती १

## श्री गजाननाची

सिद्धिविनायक निजसुखदायक जय विघ्नेशा
सुखवर दायक निजसुखकारक परत्तरवर पुरुषा,
सेंदुर चर्चित लंबोदरऽसुंदर वेषा
महिमा नकळे शेषा अगम्य जय जगदीशा
जयदेवा, जयदेवा जय एकदंता
आरती ओवाळूं तुज सद्भावे आता
जयदेवा, जयदेवा ।।१।।

श्री मन्मंगलमूर्ति देवा तु गजवदना
गणपति मति मज द्यावी आता सद्विद्या सदना
शरणांगत मी प्रतिपालक तारक या जगज्जीवना
निस्संगा निजरंगा तु करुणा निधाना
जयदेवा, जयदेवा ।।२।।



आरती २

## श्री पांडुरंगाची

आरती आनंत भूजा, विठू पंढरी राजा
नकळती उपचार, मने सारली पूजा
आरती आनंत भूजा ।।धृ।।

परेश पार नाही, नकळे निगमा ठाव
भूलला भक्ति भावे, लाहो घेतला देही,
आरती आनंत भूजा ।।१।।

अनिर्वाच्य सिद्ध बुद्ध उभा राहिला नीट
राम जनार्दनी, पायी जोडली वीट
आरती आनंत भूजा ।।२।।





आरती ३

## श्री दत्ताची

श्री दत्ता अवधूता देवा दिगंबरा ।
सहजानंदा रामा-नंदा गंभीरा ।।
अमलानंदा श्री गुरुवर्या श्रुतिसारा ।
स्वामी परमानंदा तू जगदोद्धारा ।।
जयदेवा जयदेवा जय सद्गुरु ईशा ।
आरती ओवाळू तुजपरम पुरुषा ।।१।।

हंस पीठिका मुद्रा खेचरी ।
बाळउपासना सिद्धासन विवरी ।।
गुरु परम कल्याण व्यय निजनिर्विकारी ।
दत्तात्रय अवतार तू जगदोध्दारी ।।२।।

सहजानंदा रामानंदा अप्रिया ।
अमलानंदा दुस्तर तारावली माया ।।
निस्संगा निजरंगा जय विठ्ठल राया ।
अनन्य भावे वंदू सद्गुरु सांप्रदाया ।। ३।।

आनंदसांप्रदाय नामानुक्रम ।
परंपरावदनीवदता हा नित्यनेम ।।
तरुनि तारक झाले हा नित्यनेम ।
योगिजन मुनीमानस करी पूर्ण काम ।।४।।

आरती ४

## आरती निजानंद स्वामींची

ओवाळू आरती सद्गुरु निजरंगा । स्वामी सद्गुरु निजरंगा ।
चित्तसागर कारुण तू स्थावर जंग मातरंगा ।। ध्रु ।।
ब्रह्मादिक अवतार तुजवर बहुत कल्लोळ दयाळा बहुत कल्लोळ ।
ब्रह्म परात्पर तो निजगुरुवर मायेचे मुळ ।। १ ।।
नमिन नमिन म्हणती हे दयाळा मिन तुझी आर्त ।
दयाळा मिन तुझी आर्त ।
स्वानंदे क्रीडती होउनि सबाह्य संतुष्ट ।। २ ।।
अगणित गुणीगण गणीत कवण तुज परामृत सिंधू
दयाळा परामृत सिंधू ।
श्रीरंगनुज तनुज शरण तुज भावे दीनबंधू ।। ३ ।।

आरती ५

## आरती गुरुरायाची

आरती गुरुवर्या, बहुतम नाशक चित्तसुर्या ।
ओवाळू ऐक्यभावे, तेणे कुरवंडी काया ।। ध्रु ।।
पंचप्राण पंच आरती । तेणे उजळील्या वाती ।
ऐक्याशी मिनल्या हो । स्वयंप्रकाश ज्योती ।। १ ।।
पूज्य पूजक पूजन हे । तिन्हि स्नेह सुत्र आणि वन्ही ।
मिनल्या ऐक्य भावे । तेज न मावे गगनी ।। २ ।।
कर्पुर दीपसंगे । नुरे काजळी काहि ।
निजानंद रंगला हो । स्वयं प्रकाश देहि ।। ३ ।।



आरती ६

## • आरती रंगनाथ स्वामींची •

रंगनाथाची करु आरती, धरु अंतरी गुरुमूर्ती ।। ध्रु ।।
नाझरे ग्रामी जन्म झाला, निजानंदाची कृपा त्याला ।
ब्यासाझे निगडीला, आनंदे राहती तया स्थळा ।
कृष्णा वाहे पश्चिमेसी, पुण्य पावन, असे ते स्थान ।
कलिमल दहन, घेता दर्शन ताप तया हरती ।
प्राणी जीवनमुक्त होती ।। १ ।।

लीला दावी जना लागी, विरक्त बैसे राजयोगी ।
मनोहन घोडा चपलांगी, भक्त रक्षणा धाव वेगी ।
ढाल तलवार शोभे छान, राजीव नयन रुप अनुपम्य ।
सुहास्य वदन, सुहास्य वदन
हरिहर स्मरोनी तया चित्ती, प्रेमे ओवाळू आरती ।। २ ।।

ब्राह्मण गर्वोन्मद झाला, अंत्यजा मुखी हरविला ।
घारीसी पुनर्जन्म दिधला, द्विजांचा संशय निरसीला ।
किर्तनी केला चमत्कार, राजयवन, गेला हर्षुन झाला लीन ।
श्रीहरी तांबूल सेविती । दयाळा जगत् गुरुमूर्ती ।। ३ ।।

जयराम केशव स्वामींसी, रामदास आनंदमुर्तीसी ।
पंच सद्गुरु रायासीं, सप्रेमे रंगराज यासी ।
बांधिला हरी नामाचा चंग रंगी रंग स्वरुपी दंग ।
वाचा अभंग स्मरता दोष सर्व पळती,
त्रिविध ताप तया हरिती ।। ४ ।।

निजात्मी बोध दावी सुजना, कृपेची मुर्ती रंगराणा ।
कृष्णदास लीन तव चरणा, ठाव दे पदी योगीराणा ।
महाराजा धाव पाव आता, गाजिंले फार रिपू अनिवार ।
करिती बेजार, रुतलो भव कर्दमी निगुती ।
तारी हे जगन्मय मुर्ती ।। ५ ।।

आरती ७

## • प्रदक्षिणा •

धन्य हो प्रदक्षिणा सद्‌गुरुरायाची ।
झाली त्वरा सुरवरा विमान उतरायाची ।। ध्रु ।।

पदोपदी अपार झाल्या पुण्याच्या राशी ।
सर्वहि तीर्थे घडली आम्हां आदिकरुनी काशी ।। १ ।।

मृदुंग टाळ घोष भक्त भावार्थ गाती ।
नाम संकिर्तने नित्यानंदे नाचती ।। २ ।।

करिता ब्रह्म हत्या हरती करती दंडवत ।
लोटांगण घालिता मोक्ष लोळे पायांत ।। ३ ।।

गुरुभजनाचा महिमा न कळे आगमानिगमासी ।
अनुभव ते जाणती जे गुरुपदाचे अभिलाषि ।। ४ ।।

प्रदक्षिणा करुनि देहभावे वाहिला ।
श्रीरंगात्मज विठ्ठल पुढे उभा राहिला ।। ५ ।।

* * *




।। श्री ।।

समाधी पहाता मन शांत होते । करी भक्ति त्यासीच आनंद देते ।
मनी आठविता रमे तो आरामी । नमस्कार त्या श्रीरंगनाथ स्वामी ।।



• आरती पुस्तक मिळण्यासाठी संपर्क •
श्री. डोईफोडे उपाध्ये, निगडी
मोबा. ९४२२०९०८५८ / ९८६९११६३४९ / ९२२४१८९२९०


पंढरी संदेश
श्रीक्षेत्र पंढरपूर
किंमत ११ रुपये